प्रेस नोट दिनांक १२/०१/२०२४.

## घरफोडी करणाऱ्या, सराईत आंतरजिल्हा गुन्हेगारास, शहर गुन्हे शाखेकडून, अटक.

---

फिर्यादी- अश्विनी शामराव भोसले, रा.प्लॉट नं. ५४, पाटील नगर, विजापूर रोड, सैफुल, सोलापूर या, दि.१६/१२/२०२३ रोजी, त्यांचे खाजगी कामाकरीता मुंबई येथे गेल्या होत्या. त्यानंतर काही दिवसांनी त्या, आपले वरील नमुद पत्त्यावरील घरी परत आल्या. तेव्हा त्यांचे घरातील कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यांनी घरातील ऐवज तपासुन पाहिला असता, बेडरुममधील कपाटातील ०६ नग सोन्याच्या बांगडया वजन सुमारे १२० ग्रॅम व रोख रक्कम रु. ३५,०००/- असा एकुण रु. ६,३५,०००/- रु. किंमतीचा ऐवज चोरीस गेल्याचे दिसून आले. सदर घटनेबाबत त्यांनी, विजापूर नाका पोलीस स्टेशन सोलापूर शहर येथे दिलेल्या फिर्यादी वरुन, अज्ञात चोरटया विरुध्द गुन्हा रजि नं. ७०४/२०२३ भा.दं.वि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तसेच, पाटील नगर, येथील अन्य एका घटनेत, फिर्यादी सुरज गणपतराव पाटील रा. ३४७/१, समर्थ बंगला, सवेरा नगर, गोविंद मेडिकलच्या मागे सैफुल विजापूर रोड सोलापूर (सध्या रा. पुणे ) यांचे वडील हे मुलास व सुनेस भेटण्याकरीता दि.१७/१२/२०२३ रोजी सकाळी ०९:०० वा. पुणे येथे घर बंद करुन गेले. ते दि.१८/१२/२०२३ रोजी सकाळी ०९:०० वा. परत सोलापूर येथील घरी आले. तेव्हा त्यांचे घराचे मुख्य दरवाज्याचा कडी कोयंडा तुटलेला दिसला. घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. घरातील लोखंडी कपाट उचकटून, एक सोन्याची पिळयाची अंगठी, चांदीचे पैजन, शिक्के व रोख रक्कम असा एकुण ३२,०००/- रु. किंमतीचा ऐवज चोरीस गेला होता. सदर घटनेबाबत त्यांनी विजापूर नाका पोलीस स्टेशन सोलापूर शहर येथे दिलेल्या फिर्यादी वरुन अज्ञात चोरटया विरुध्द गुन्हा रजि नं. ६९८/२०२३ भा.दं.वि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गंभीर स्वरूपाचे घरफोडीचे दोन्ही गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मा.पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे सूचनेनुसार, गुन्हे शाखेच्या डॉ. दीपाली काळे, पोलीस उपायुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे, तसेच श्री. सुनिल दोरगे, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी, गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह घटनास्थळास भेट दिली होती. त्यानंतर, गुन्हे शाखेकडील घरफोडीचे दोन गंभीर स्वरुपाचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने, गुन्हे शाखेडील तिन तपास पथके अज्ञात आरोपीचा तांत्रिक विश्लेषणाद्वारे तसेच खबऱ्यांना भेटून त्या माध्यमातून शोध घेत होते.

वर नमूद दोन्ही घटनास्थळाचे आजूबाजूचे परिसरात सी.सी.टी.व्ही फुटेज जवळपास नव्हते. सपोनि दादासो मोरे यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार इम्रान जमादार यांनी, सदर दोन्ही घटनास्थळ परिसराची बारकाईने पाहणी करुन, त्यामध्ये, काही तांत्रिक माहिती प्राप्त करून, त्याचे अचुक विष्लेषण केले.

त्यानंतर, दि.०६/०१/२०२४ रोजी सपोनि/दादासो मोरे यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार इम्रान जमादार यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, " सदरचा गुन्हा हा रेकॉर्डवरील सराईत आंतरजिल्हा गुन्हेगार नामे- मोहन दौलतराव मुंडे रा.क्रांतीनगर, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड व त्याचा आणखी एक साथीदार असे दोघांनी मिळून केली आहे. तसेच ते दोघे दि. ०६/०१/२०२४ रोजी पुन्हा सोलापूर शहरात घरफोडया करण्यासाठी आले असून, ते जुना विजापूर नाका, कंबर तलाव परिसरातील पुतळयाजवळ भिंतीजवळ बसले आहेत."

त्यानुसार, पोसई अल्फाज शेख, इम्रान जमादार व विनोद रजपूत यांनी कौशल्याने मिळवलेल्या तांत्रिक माहितीची तसेच मिळालेल्या बातमीची खात्री करुन, सदरचे दोन्ही गुन्हे हे, रेकॉडवरील सराईत आंतरजिल्हा गुन्हेगार- मोहन दौलतराव मुंडे याने त्याचे एका साथीदारासह केला असल्याची खात्री केली.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर, पोलीस उप निरीक्षक श्री. अल्फाज शेख व पथकातील अंमलदार यांनी, जुना विजापूर नाका, कंबर तलाव परिसरात सापळा लावून, **(१) मोहन दौलतराव मुंडे रा.क्रांतीनगर, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड व त्याचा आणखी एक साथीदार असे दोघांना ताब्यात घेतले. त्यावेळी, दुसऱ्या साथीदाराचे नाव- सोहेल जलील शेख, वय-२० वर्षे, रा.करबला वेस, दमगान पूरा, आंबेजोगाई, जि.बिड असे असल्याचे निष्पन्न झाले.**

सदर दोन्ही इसमांकडे कौशल्याने तपास केला असता, त्या दोघांनी दि. १७/१२/२०२३ रोजी सोलापूर शहरात येवुन,रात्रीच्या वेळी विजापूर रोड, सैफुल परिसरातील (१) सुरज गणपतराव पाटील (२) अश्विनी शामराव भोसले यांची घरे दाखवून, त्या ठिकाणी, दोन्ही घराचे, कुलूपे लोखंडी कटावणीने तोडून, घरातील सोने - चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरुन नेल्याची कबूली दिली. तसेच, चोरी केलेले दागिने देखील काढून दिल्याने, ते जप्त करणेत आलेले आहेत.

नमूद दोन्ही आरोपीकडून, पोलीस उप निरीक्षक अल्फाज शेख व पथकाने तपासामध्ये खालील नमूद प्रमाणे, चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त करून, ०२ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | जप्त माल. | किंमत. |
|---|---|---|---|---|
| १ | विजापूर नाका | ७०४/२०२३ भा.दं.वि कलम ४५४, ४५७, ३८० | १) १२ तोळे सोने.<br>२) रोख रक्कम. | ६,००,०००/- रुपये.<br>१२,०००/- रुपये. |
| २ | विजापूर नाका | ६९८/२०२३ भा.दं.वि कलम ४५४, ३८० | १) ५ ग्रॅम सोने.<br>२) १५० ग्रॅम चांदी.<br>३) रोख रक्कम . | १५,०००/- रुपये.<br>७,०००/- रुपये<br>३,०००/- रुपये. |
| | | | **गुन्हा करण्यासाठी वापरलेली कटावणी** | २००/- रुपये. |
| | | | **जप्त मालमत्ता एकुण किंमत.** | ६,३७,२००/- रुपये. |

सदरची कामगिरी ही, मा. डॉ. श्री. राजेंद्र माने, पोलीस आयुक्त सोलापुर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उपायुक्त गुन्हे, प्रांजली सोनवणे , सहा.पोलीस आयुक्त गुन्हे तसेच श्री. सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेकडील सपोनि श्री. दादासो मोरे, पोलीस उप निरीक्षक श्री अल्फाज शेख व त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार संदीप जावळे, विनोद रजपुत, इम्रान जमादार, राजकुमार पवार, बापू साठे, सुभाष मुंडे, सतीश काटे, बाळासाहेब काळे, सायबर पो.स्टे कडील अविनाश पाटील, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, वसीम शेख, इब्राहीम शेख यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर.**
**यांचे करीता.**

Scanned with OKEN Scanner


गुन्हे शाखा सोलापूर शहर